जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन
१, वेलस्ली रोड, कँप, पुणे - १.
जा.क्र. जिग्राविय/ लेखा/१५०४/२०१६,
पुणे. दिनांक - १७/१०/२०१६.

प्रति,

अध्यक्ष,
सनदी लेखापाल संघटना,
आयसीएआय भवन,
पुणे शाखा, शारदा सहकारी बँके शेजारी,
बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

विषय :- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे कार्यालयाच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापाल नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ :- मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील संदर्भ क्रमांक संकिर्ण / २०१६/ प्रक्र ३७/ योजना-२, दिनांक ३० ऑगस्ट २०१६ व मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. विकास / कार्या ३ /CA/ ३३५/२०१६ दिनांक १२/९/२०१६.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, पुणे जिल्ह्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे कार्यालयाकडील केंद्र पुरस्कृत योजनांचे वित्तीय वर्ष सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या तीन वर्षा करीता लेखा परिक्षण करणेकामी आठ सनदी लेखापाल असलेले एक पॅनल मा. सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे मान्यतेने करावयाचे आहे. त्या अनुषंगाने सदरहू आशयाची जाहिरात जिल्हा परिषद संकेतस्थळावर (Website) व स्थानिक वर्तमानपत्रात उपलब्ध करुन देणेत आलेली असून सदरची बाब याद्वारे आपले निदर्शनास आणून देणेत येत आहे.

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे.

सोबत :- जाहिरातीचा नमुना.

Institute of C...
DIARY
Received On
24 OCT 2016
PUNE

PUNE BRANCH OF W.I.R.C.
INWARD NO.:- 2477
DATE:- 24/10/2016 TIME:
SIGNATURE:-
RECEIVER NAME:-

जाहिरातीचा नमुना

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे कडील केंद्र पुरस्कृत योजनांचे सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षासाठी लेखा परिक्षण करणेसाठी आठ सनदी लेखापाल असलेले एक पॅनल मा. सचिव, ग्राम विकास यांचे मान्यतेने करावयाचे आहे. तरी संबंधित सनदी लेखापाल यांचेकडून खालील अटी व शर्तीनुसार अर्ज मागविणेत येत आहेत.

१) लेखा परिक्षणाचे शुल्क खालील प्रमाणे आकारण्यात यावे.

अ) रुपये पन्नास कोटी पर्यंत खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी - रु. ५०,०००/-

आ) रुपये ५०,००,००,००१/- ते ७५,००,००,०००/- पर्यंत खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी - रु. ६०,०००/-

इ) रुपये ७५,००,००,०००/- पेक्षा अधिक खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी - रु. ७०,०००/-

२) वर नमुद केलेले लेखा परिक्षणाचे शुल्क या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क / कर इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाही.

३) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणामध्ये गट पातळीवर लेख्यांचा लेखा परिक्षणामध्ये समावेश राहील.

४) लेखा परिक्षण अहवाल जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयास सादर करण्याबाबतची मुदत आणि विहीत मुदतीत अहवाल यंत्रणा कार्यालयास सादर न झाल्यास दंड वसुल करणे तसेच लेखा परिक्षणासाठी निश्चित केलेल्या शुल्का व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क / कर इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत. यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाबरोबर लेखी करार करावा लागेल.

५) या जाहिराती संबंधी योजने संदर्भातील अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाकडे संपर्क साधण्यात यावा. (दूरध्वनी क्र. ०२०-२६१३१७८४)

इच्छुक सनदी लेखापालांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयाशी संपर्क साधुन आपले विहीत नमुन्यातील प्रस्ताव / अर्ज जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे दिनांक ७/११ /२०१६ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत. सदर प्रस्ताव / अर्ज विभागीय आयुक्त कार्यालयाकडे परस्पर पाठवू नयेत. पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

सही/-
अध्यक्ष, कार्यकारी समिती,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.